| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.४३७३/२०१६ |
| सरकार -वि- अंजली |
| निशाणी क्र. ३५ |

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांची शपथेवर सरतपासणी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | सरीता विजयराव पराडकर, |
| **वय** | : | ३३ वर्षे, |
| **धंदा** | : | गृहिणी, |
| **राहणार** | : | वाठोडा, श्रावणनगर, नागपूर |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती प्रियंका भा. झिरपे यांचेमार्फत-**

१. मार्च २०१६ मध्ये मी लकडगंज पोलीस स्टेशनला सलग्न होमगार्ड म्हणून काम करीत होते. दिनांक १५.०३.२०१६ रोजी माझी सकाळी ९.०० ते सायंकाळी ९.०० वाजेपर्यंत गंगाजमुना परिसरात पेट्रोलींगची डयुटी होती. त्यादिवशी माझ्यासोबत लकडगंज पोलीस स्टेशनचे एक वरिष्ठ पोलीस अधिकारी आणखीन दोन पोलीस कर्मचारी होते. गंगाजमुना परिसरात संध्याकाळी ४.०० ते ४.३० वाजताच्या सुमारास आम्ही पेट्रोलींग करीत असतांना रस्त्यावर एक महिला येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना पाहून अश्लील चाळे करीत होती.आमच्या सोबत असलेले वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी तिचे नाव विचारले. तिने आपले नाव सांगितले परंतु मला तिचे नाव आता आठवत नाही. तिच्याकडे पुढील चौकशी केली असता तिने कालखोड या नावाच्या व्यक्तीसाठी देहव्यवसाय करीत असल्याचे सांगितले. सदर महिलेला आम्ही नंतर लकडगंज पोलीस स्टेशन येथे नेले. सदर प्रकरणात पोलीसांनी माझा जवाब नोंदविला होता.

**उलट तपास आरोपीतर्फे आरोपीचे विद्वान विधीज्ञ श्री. अब्दुल अजीम यांचेमार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, लकडगंज पोलीस स्टेशन येथे महिला पोलीस शिपाई यांची नेमणूक आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर पेट्रोलींग डयुटीवर असतांना आमच्यासोबत लकगडगंज पोलीस स्टेशन येथील महिला शिपाई नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ती महिला कशा प्रकारचे अश्लील चाळे करीत होती हे मी आता सांगू शकत नाही. साक्षीदार आता सांगते की, ती येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना अडवायची. हे म्हणणे खरे आहे की गंगाजमुना परिसरात बऱ्याच लोकांची रहदारी आहे व तेथे एक पोलीस चौकी देखील आहे. हे म्हणणे खरेआहे की, सदर पोलीस चौकीत पोलीस कर्मचारी डयुटीवर हजर असतात. त्या परिसरात किती लोकांचे नाव कारखोड आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या महिलेने ती कारखोड या नावाच्या व्यक्तीसाठी काम करते असे मला सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ती महिला ज्या येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना अडवित होती त्या लोकांनी काही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाहीकी, मी सांगितल्याप्रमाणे दिनांक १५.०३.२०१६ रोजी मी गंगाजमुना परिसरात पेट्रोलींग डयुटीवर गेले नव्हते.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास – नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2025.11.11 17:24:05 +0530

**( अनामिका दे. बोस )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक ११.११.२०२५